# कार्यप्रणाली

## पर्यावरण (संरक्षण) कायदा सन १९८६ व ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियत्रंण) अधिनियम २००० मधील तरतूदींच्या अनुषंगाने करावयाची कार्यप्रणाली खालील प्रमाणे -

*******

पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ व ध्वनीप्रदुषंण (विनियमन व नियंत्रण) नियम २००० च्या तरतुदींना अनुसरुन करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे या कायद्याखाली कायद्याचे उल्लघंन करण्याऱ्या व्यक्ती विरुध्द करावयाच्या कार्यपध्दतीत खुप फरक आहे. आपण नेहमी दखलपात्र गुन्हयांची तक्रार झाली असता पोलीस ठाण्यात गून्हा नोंद करुन त्याचा तपास करुन योग्य त्या न्यायालयात दोषारोपपत्र पाठवितो. परंतु पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ व ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) नियम २००० या प्रकरणी कारवाई करताना पोलीस ठाणेमध्ये गुन्हा दाखल करुन त्याचा तपास झाल्यावर न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करता येत नाही. या कायद्याचा अभ्यास केला असता या प्रकरणी खालील प्रमाणे कार्यवाही करणे जरुरीचे आहे.

१. पोलीस ठाणेच्या हद्दीतील शांतता क्षेत्राची माहिती घेऊन सदर भागातील ध्वनीमापक संयंत्राद्वारे ध्वनीचे कंट्रोल नमुने घ्यावेत. त्याबाबत पंचनामा व ठाणे दैनंदिनीमध्ये नोंद घ्यावी. (शांतता क्षेत्र, मिरवणुकीचा मार्ग, महत्वाची ठिकाणे)

२. एखाद्या ठिकाणी ध्वनीप्रदुषण होऊन आजुबाजुच्या लोकांना व सर्व सामान्य जनतेस त्रास होत आहे. अशी तक्रार आल्यास ती लिहुन घ्यावी व स्टेशन डायरीला नोंद करुन त्या तक्रारींचा खरे खोटेपणा पाहण्यासाठी घटनास्थळी जावे.

३. घटनास्थळी जाणेपूर्वी पोलीस ठाणेमध्ये दोन सुशिक्षीत व्यक्तींना बोलाऊन त्यांना घटनेविषयी पूर्ण कल्पना देवून ध्वनी प्रदुषण मोजण्याचे जे उपकरण आहे. त्या उपकरणांची कार्यरिती समजावून घेऊन त्या दोन व्यक्तींना पंच म्हणुन बरोबर न्यावे.

४.घटनास्थळी गेल्यावर दोन पंचांच्या समक्ष ध्वनीची तिव्रता मोजण्याच्या उपकरणाच्या सहाय्याने घटनास्थळी ध्वनीची तिव्रता किती आहे, याची नोंद करावी. ध्वनी तिव्रता यंत्रा मोजलेल्या तिव्रतेची घटनास्थळीच यंत्रामधून तिन प्रिंट काढाव्यात. घटनास्थळाचे छायाचित्रण करावे. मोजलेली तिव्रता ही निवासी क्षेत्र ५५ डेसीबल व शांतता क्षेत्रात ५० डेसीबल या मानद मर्यादेपेक्षा अधिक असल्याचे आढळून आल्यास घटनास्थळी दिसते परिस्थितीचा व ध्वनीतिव्रता किती आहे याची स्पष्ट नोंद करुन सविस्तर पंचनामा करावा याचवेळी ध्वनीची तिव्रता मानव डेसीबल पेक्षा १० डेसीबलने जास्त असल्यास घटनास्थळावरील ध्वनीप्रदूषण निर्माण करणारी सर्व उपकरणे पंचांच्या समक्ष पंचनामा करुन जप्त करुन ताब्यात घ्यावीत. या पंचनाम्याची एक प्रत, ध्वनी तिव्रता यंत्राद्वारे काढलेल्या प्रिंटची एक प्रत मंडळाच्या अध्यक्षास अथवा जबाबदार व्यक्तीस देवून प्रत मिळाल्याबाबत मूळ पंचनाम्यावर त्यांची सही घ्यावी संबंधीतांनी पंचनामा व प्रिंट प्रत घेण्यास नकार दिला तर त्याची नोंद पंचनाम्यावर करावी.

तसेच घटनास्थळी गेलेल्या अधिकारी, कर्मचारी व पंचांचे जबाब हे नमूना जबाब दिलेल्या प्रमाणे नोंद करावेत.

५.याच वेळी ध्वनीच्या तिव्रतेने म्हणजेच ध्वनीप्रदुषणाने होत असलेल्या त्रासाबाबत जवळपासच्या लोकांचे जबाब नोंदवून घ्यावेत. जवळपास दवाखाने, शाळा, प्रार्थनास्थळे असल्यास तेथील व्यक्तींचे जाब-जबाब न विसरता नोंदवावेत.

६. घटनास्थळावरुन परत आल्यानंतर स्टेशन डायरीमध्ये घटनास्थळावरील घटनेची व तेथे जप्त करण्यात आलेल्या उपकराणाची नोंद करावी.

७. त्यानंतर घटनास्थळी जाणा-या पोलीस अधिका-याने आपल्या अहवालासोबत चौकशीचे सर्व कागदपत्र त्वरीत पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ व ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) नियम २००० मधील तरतुदीप्रमाणे निर्माण करण्यात आलेल्या प्राधिकरणाकडे पाठवून द्यावेत.

८. संबंधीत पोलीस अधिका-यानी सादर केलेल्या चौकशीचा अहवाल प्राधिकरणाकडे प्राप्त झाल्यानंतर कागदपत्रांचे अवलोकन करुन ज्याकोणी व्यक्तींनी ध्वनी प्रदुषण केले आहे अशा उक्त व्यक्तीना प्राधिकरण ६० दिवसांची नोटीस देवून स्वत: पुढे उपस्थित राहण्याची आणि पुढील कायदेशीर कार्यवाही बाबतची माहिती देवून संबंधीत व्यक्तीला कारणे दाखवा नोटीस देतील. सदरची नोटीस मिळाल्यापासून संबंधीतांनी ६० दिवसांचे आत समक्ष स्वत: हजर राहून खुलासा सादर करणेचा आहे. प्राधिकरणाने दिलेल्या नोटीसीसंदर्भाने संबंधीतांनी मुदतीत खुलासा सादर न केल्यास संबंधीतांना काहीही खुलासा करावायाचा नाही असे समजून ध्वनी प्राधिकरण आधिकारी पुढील कायदेशीर कारवाई करेल याची जाणीव करुन दयायची आहे.

९.ध्वनी प्राधिकरण अधिकारी दिलेल्या नोटीसीनंतर संबंधीतांनी दिलेला खुलासा समाधानकारक न वाटल्यास तो अमान्य करुन पोलीस अधिकारी यांनी केलेल्या चौकशी अहवालाची कागदपत्रे तसेच खुलाशची कागदपत्रे याची चौकशी करुन त्यात ध्वनी प्रदुषण करणारी व्यक्ती, संस्था, मंडळे हे दोषी असलेचे आढळून आल्यास त्यांचेविरुध्द योग्य त्या सक्षम

न्यायालयाकडे सी.आर.पी.सी. कलम २०० अन्वये फिर्याद दाखल करतील. सक्षम न्यायालय प्राधिकरणाने दाखल केलेल्या फिर्यादीची तपासणी करुन फिर्यादीची दखल घेवून त्यामध्ये नमुद असलेल्या आरोपीविरुध्द सी.आर.पी.सी. कलम २०४ नुसार इश्यु प्रोसेसचा आदेश जारी करतील. सदरची फिर्याद ही पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ कलम १५ च १९ द्वारे दाखल केली जाते.

शासनाने निर्देशित केलेल्या वरील सूचनांप्रमाणे सक्षम न्यायालयात फिर्याद दाखल करण्याचे अधिकार पोलीस खात्याला आहेत. पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याचे अधिकार पोलीस खात्याला नाहीत.

टिप - ध्वनीची तिव्रता मोजण्याकामी प्रशिक्षित पोलीस अधिकारी / अंमलदार यांची नेमणुक करावी.

**सोबत :-**

| अ. क्र. | नमूना | प्रपत्र. |
|---|---|---|
| १. | ध्वनीक्षेपक (लाऊडस्पीकर) / पब्लीक ॲर्डस् सीसटीम / डिजे इ.वापरासाठी नमुना अर्ज. व त्याबाबत दयावयाची परवानगीचा नमूना. - | A |
| २. | ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम २००० कलम ८ प्रमाणे नोटीसचा नमूना | B |
| ३. | ध्वनी प्रदुषण मोजमापाच्या व त्या संदर्भाने करावयाच्या कंट्रोल सॅम्पल पंचनाम्याचा नमूना व आदर्श पंचनामाच्याचा नमूना. | C |
| ४. | पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या जबाबाचा नमूना. | D |
| ५. | संबंधीत पोलीस स्टेशनच्या कारवाई केलेल्या अधिकारी यांनी ध्वनी प्राधिकरण अधिकारी यांना सादर करण्याच्या रिपोर्टचा नमुना. | E |
| ६. | कारणे दाखवा नोटीसचा नमूना. | F |
| ७. | प्रथम खबरीचा नमूना. | G |

A

## ध्वनीक्षेपक/लाऊडस्पीकर वापरासाठी अर्ज

दिनांक / /

रू.५ चा कोर्ट फी स्टॅम्प

प्रति,
मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो.,
..............................पो.स्टे.
..............................

### भाग — अ : ध्वनिक्षेपक/लाऊडस्पीकर वापराबाबत तपशील
### ध्वनीक्षेपक वापरण्यांच्या अर्जाचे कारण

| | |
|---|---|
| अर्जदाराचे नाव | |
| पत्ता व दूरध्वनी क्रमांक/मोबा. नं. | |
| संस्था/संघटना/पक्ष मंडळ पत्ता आणि नोंदणी क्रमांक | |
| आयोजकाचे नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक | |
| कार्यक्रमाचे स्वरूप | |
| कार्यक्रमांची दिनांक व वेळ | |
| कार्यक्रमाची जागा | |
| कार्यक्रमासाठी परवानगी | आवश्यक/अनावश्यक (आवश्यक असेल तर कार्यक्रमासाठीचा परवाना/परवान्यासाठीचा अर्ज कृपया सोबत जोडावा) |
| ध्वनीक्षेपक/लाऊडस्पीकर वापरण्यासाठीचा कालावधी | सुरू होण्याची वेळ<br>संपण्याची वेळ |
| वापरण्यांत येणाऱ्या ध्वनिक्षेपक/लाऊडस्पीकर यांची संख्या | |
| जनरेटरची सुविधा | आहे/नाही |
| ध्वनिक्षेपक/लाऊडस्पीकर ठेकेदाराचे नाव व परवाना क्रमांक | |
| ध्वनिक्षेपक ठेकेदारांच्या परवान्याची प्रत | जोडली आहे/ नाही |

खालील अटींच्या व शर्तीच्या अधिन राहून ध्वनिक्षेपक वापरण्याची परवानगी देण्यात येईल याची मला जाणीव आहे.

(B)

## अटी व शर्ती :

खालील अटीच्या व शर्तीच्या अधीन राहून ध्वनिक्षेपक/लाऊडस्पीकर वापरण्याची परवानगी देण्यात येईल याची मला जाणीव आहे.

१) ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम –२००० अन्वये कार्यक्रमाचे क्षेत्र शांतता क्षेत्रात व १०० मीटर परिसरात असल्यास ध्वनिक्षेपक/लाऊडस्पीकर वापरण्याची परवानगी मिळणार नाही. सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम –२००० अन्वये गुन्हा दाखल होईल व सदर गुन्हा शाबिती नंतर पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ कलम १५ अन्वये ५ वर्षापर्यंत कैद व १ लाख रू. दंड किंवा दोन्ही शिक्षा दिली जाईल, याची मला जाणीव आहे.

२) ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम –२००० अन्वये आवाजाची पातळी खालील नमुद केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त असु नये याची मला जाणीव आहे. सदर मर्यादेचे उल्लंघन केल्यास ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम –२००० अन्वये गुन्हा दाखल होईल व सदर गुन्हा शाबिती नंतर पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ कलम १५ अन्वये ५ वर्षापर्यंत कैद व १ लाख रू. दंड किंवा दोन्ही शिक्षा दिली जाईल, याची मला जाणीव आहे.

| क्षेत्र | दिवसा (०६.०० ते २२.०० वा.) | रात्री (२२.०० ते ०६.०० वा.) |
|---|---|---|
| औद्योगिक क्षेत्र | ७५ डी.बी. (अे) एलईक्यू | ७० डी.बी. (अे) एलईक्यू |
| व्यापारी क्षेत्र | ६५ डी.बी. (अे) एलईक्यू | ५५ डी.बी. (अे) एलईक्यू |
| निवासी क्षेत्र | ५५ डी.बी. (अे) एलईक्यू | ४५ डी.बी. (अे) एलईक्यू |
| शांतता क्षेत्र | ५० डी.बी. (अे) एलईक्यू | ४० डी.बी. (अे) एलईक्यू |

३) ध्वनिक्षेपक परवानगी असली तरीही, तक्रार प्राप्त होताच ध्वनीक्षेपक बंद करण्याचा अधिकार पोलीसांना राहील.

४) डि.जे.साऊंडचा वापर करण्यास मनाई आहे.

५) ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम –२००० अन्वये दिवसा ०६.०० वा. ते रात्रौ २२.०० वा. पर्यंत तसेच शासनाने विशेष वेळी कलम ५ अन्वये अधिकाराचा वापर करून रात्रौ २२.०० वा. ते २४.०० वा. पावेतो दिलेल्या परवानगीच्या विहित वेळेत ध्वनीक्षेपक/लाऊडस्पीकर बंद न केल्यास आयोजकांवर ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम –२००० अन्वये गुन्हा दाखल होईल याची नोंद घ्यावी.

६) अर्जामध्ये नमूद केलेली ध्वनिक्षेपकाची जागा पोलिसांच्या पूर्व परवानगी शिवाय बदलू नये.

७) ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम –२००० कलम ८ अन्वये दिलेल्या आदेशाच्या निर्देशाचे उल्लंघन केल्यास ध्वनीक्षेपक/लाऊडस्पीकर वापराकरीता दिलेला परवाना रद्द केला जाईल याची मला जाणीव आहे.

अर्जदाराची सही

A

# ध्वनीक्षेपक/लाऊडस्पीकर वापराचा परवाना

परवाना क्रं.    /    , दिनांक    /    /

जा.क्रं./ ............/

.........................पो.स्टे.

दिनांक    /    /

प्रति,
अर्जदाराचे नाव :–

पोलीस ठाणेचे नाव व पत्ता असलेला शिक्का

याव्दारे खालील कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| कार्यक्रम | | |
| दिनांक | | |
| ठिकाण | | |
| उपस्थिती | | |
| सुरू होण्याची वेळ | सकाळी | |
| संपण्याची वेळ | सायंकाळी | |
| ध्वनिक्षेपक ठेकेदाराचे नाव व पत्ता व परवाना क्रमांक | | |

- खालील अटींच्या व शर्तींच्या अधीन राहून ध्वनिक्षेपक वापराची परवानगी देण्यात येत आहे याची मला जाणीव आहे.
- १) ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम –२००० अन्वये शांतता क्षेत्रात व शांतता क्षेत्राच्या १०० मीटर परिसरात ध्वनिक्षेपक/लाऊडस्पीकर लावण्यास, वापरास व कोणत्याही प्रकारचे वाद्य वाजविण्यास मनाई आहे. सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम –२००० अन्वये गुन्हा दाखल होईल व सदर गुन्हा शाबिती नंतर पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ कलम १५ अन्वये ५ वर्षापर्यंत कैद व १ लाख रू. दंड किंवा दोन्ही अशी शिक्षेची तरतुद आहे.
- २) ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम –२००० अन्वये आवाजाची पातळी खालील नमुद केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त असु नये याची मला जाणीव आहे. सदर मर्यादेचे उल्लंघन केल्यास ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम –२००० अन्वये गुन्हा दाखल होईल व सदर गुन्हा शाबिती नंतर पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ कलम १५ अन्वये ५ वर्षापर्यंत कैद व १ लाख रू. दंड किंवा दोन्ही अशी शिक्षेची तरतुद आहे.

| क्षेत्र | दिवसा (०६.०० ते २२.०० वा. ) | रात्री (२२.०० ते ०६.०० वा.) |
|---|---|---|
| औद्योगिक क्षेत्र | ७५ डी.बी. (अे) एलईक्यू | ७० डी.बी. (अे) एलईक्यू |
| व्यापारी क्षेत्र | ६५ डी.बी. (अे) एलईक्यू | ५५ डी.बी. (अे) एलईक्यू |
| निवासी क्षेत्र | ५५ डी.बी. (अे) एलईक्यू | ४५ डी.बी. (अे) एलईक्यू |
| शांतता क्षेत्र | ५० डी.बी. (अे) एलईक्यू | ४० डी.बी. (अे) एलईक्यू |

- ३) ध्वनिक्षेपक परवानगी असली तरीही, तक्रार प्राप्त होताच ध्वनीक्षेपक बंद करण्याचा अधिकार पोलीसांना राहील.
- ४) डि.जे.साऊंडचा वापर करण्यास मनाई आहे.
- ५) ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम –२००० अन्वये दिवसा ०६.०० वा. ते रात्रौ २२.०० वा. पर्यंत तसेच शासनाने विशेष वेळी कलम ५ अन्वये दिलेल्या अधिकाराचा वापर करून रात्रौ २२.०० वा. ते २४.०० वा. पावेतो दिलेल्या परवानगीच्या विहित वेळेत ध्वनीक्षेपक/लाऊडस्पीकर बंद न केल्यास आयोजकांवर ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम –२००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात येईल.
- ६) अर्जामध्ये नमूद केलेली ध्वनिक्षेपकाची जागा पोलिसांच्या पूर्व परवानगी शिवाय बदलता येणार नाही.
- ७) ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम –२००० कलम ८ अन्वये दिलेल्या आदेशाच्या निर्देशाचे उल्लंघन केल्यास ध्वनीक्षेपक/लाऊडस्पीकर वापराकरीता दिलेला परवाना रद्द केला जाईल.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक

पोलीस निरीक्षक (जनसंपर्क)

B

# ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम २००० कलम ८ प्रमाणे नोटीस

दिनांक :—

प्रति,

.......................................

.......................................

.......................................

ज्याअर्थी, मला ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम —२००० कलम ८ प्रमाणे नोटीस प्रमाणे प्राप्त अधिकारानुसार येत्या काही दिवसांमध्ये मोठया प्रमाणावर सण साजरे होत आहेत. त्यामुळे मोठया प्रमाणावर वाद्य व लाऊडस्पीकर सिस्टीम इत्यादींचा वापर होणार असून, मोठया प्रमाणावर ध्वनीप्रदुषण होणार आहे. ध्वनीप्रदुषणामुळे अनेक लोकांना, वृध्दांना, रूग्णांना मानसिक तसेच शारिरीक त्रास होतो.

मा. सर्वोच्च न्यायालय यांचे निर्देशानुसार, तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम सन १९८६ सह ध्वनीप्रदुषण विनियमन व नियंत्रण नियमावली २००० चे अन्वये ध्वनीक्षेपक/लाऊडसपीकर, संगीत वाद्य व इतर वाद्यांचा वापर शासनाने विशेष वेळी एका कॅलेंडर वर्षात १५ दिवस रात्रौ २२.०० वा.ते २४.०० वा. पावेतो दिलेली सवलत खेरीज करून इतर दिवशी दररोज सकाळी ०६.०० वा. ते २२.०० वा. पावेतो करता येईल. तसेच या कायद्यान्वये ध्वनीक्षेपक/लाऊडसपीकर, वाद्याचा वापर हा शांतता क्षेत्र वगळून इतर ठिकाणी खालील नमुद क्षेत्रानुसार खालील डेसीबल मर्यादेपेक्षा जास्त ठेवण्यात येवू नये.

| क्षेत्र कोड | क्षेत्र | दिवसा (०६.०० ते २२.०० वा.) | रात्री (२२.०० ते ०६.०० वा.) |
|---|---|---|---|
| अ | औद्योगिक क्षेत्र | ७५ डी.बी. (अे) एलईक्यू | ७० डी.बी. (अे) एलईक्यू |
| ब | व्यापारी क्षेत्र | ६५ डी.बी. (अे) एलईक्यू | ५५ डी.बी. (अे) एलईक्यू |
| क | निवासी क्षेत्र | ५५ डी.बी. (अे) एलईक्यू | ४५ डी.बी. (अे) एलईक्यू |
| ड | शांतता क्षेत्र | ५० डी.बी. (अे) एलईक्यू | ४० डी.बी. (अे) एलईक्यू |

त्याअर्थी, मी आपणास आदेश देतो की, सदर सणा दिवशी वापरण्यात आलेले ध्वनीक्षेपक/लाऊडसपीकर व वाद्य इत्यादींचा पर्यावरण (संरक्षण) कायदा सन १९८६ सह ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) नियमावली २००० चे अन्वये ठरवून दिलेल्या डेसीबल क्षमतेपेक्षा जास्त वापर किंवा त्याच्या ठराविक मर्यादेची आवाजाची पातळी ओलांडू नये.

अन्यथा, सदर आदेशाचे भंग केल्याबाबत पर्यावरण (संरक्षण) कायदा सन १९८६ सह ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) नियमावली २००० चे कलम १५ अन्वये आपल्या विरूध्द गुन्हा दाखल होवून आपण वापरलेले वाद्य व लाऊडस्पीकर सामुग्री जप्त करण्यात येईल.

सहा.पोलीस आयुक्त/पोलीस उप अधिक्षक

(5)

C

(सामान्य ध्वनी तीव्रता पंच)

पंचनामा (कंट्रोल सॅम्पल)

तारीख- / /

पंच १ ----------------------------------------------------------------------------------------------------

२ ----------------------------------------------------------------------------------------------------

मी ---------------------------- पोहवा-------------------, पोना ------------------, पोशि------- वरील नमूद पंचांना ------------------- आम्ही ----------------- पोलीस ठाणे. . . . . . . . येथे बोलावले, त्यावरुन ते हजर झाले. आम्ही पंचांना कळविले की, ------------ या ठिकाणी ध्वनीप्रदुषण होते अगर कसे याबाबत पडताळणी करण्याचे असल्याने आपण पंच म्हणून समक्ष हजर राहून दिसते. वस्तुस्थितीचे परिस्थितीचा पंचनामा करणेबाबत कळविले त्यानुसार ते पंच म्हणून उपस्थित राहिले.

आम्ही पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ व त्यास अधिन ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम, २००० चे अन्वये कलम १५ व १९ नुसार कायदेशीर कार्यवाही व क्षेत्र / झोन प्रवर्ग अन्वये दिवसा व रात्री असलेली आवाजाच्या संबंधातील सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेचा दर्जा db (A) leq प्रमाणे केली जाते. याबाबत थोडक्यात माहिती दिली. व आम्ही आमच्या ताब्यात असलेले ध्वनीमापक संयंत्र दर्शविले व ते पंचासमक्ष चालू करुन सदरचे यंत्र कार्यपध्दती व त्याचा उपयोग , वापर व हातळणीबाबत थोडक्यात माहिती दिली व पुर्णपणे प्रात्यक्षिक दाखविले. त्याप्रमाणे सदरचे ध्वनीमापक संयंत्र योग्यरित्या कार्यरत असल्याची खात्री केली.

माझे अहवालाप्रमाणे व आदेशानुसार ठाणे अंमलदार --------------- यांनी पोलीस ठाणेतील ठाणे डायरी नोंद क्रमांक ------------- वेळ -------- येथे नोंद घेतली त्यानंतर आम्ही पंच ------------- सदर ठिकाणी मोजणीसाठी लागणारी ध्वनीतिव्रता मोजणी यंत्र db (A)leq यंत्रावर मोजलेल्या चाचणीची प्रत काढणेकरीता प्रिंटर ------------- येथे सरकारी वाहनांने हजर झालो व सदर ठिकाणी दिसते वस्तुस्थितीचा आम्ही पंचनामा केला तो खालीलप्रमाणे.

------------------- याठिकाणी सध्याचे आवाजाची तीव्रता (ध्वनी) किती आहे हे आम्ही सन २० मधील सार्वजनिक गणेशात्सवाचे विसर्जन मिरवणुकांचे पार्श्वभूमीवर डेसीबल मोजमाप मशीनद्वारे चेक करीत आहोत. त्यास पंचांनी सहमती दर्शविल्यानंतर सदर वेळी कोणताही ध्वनीक्षेपक नजरचे टप्प्यात नाही.

आम्ही स्वत:सोबतचे स्टाफसह व पंचांचे उपस्थितीत ---------------- ---- या चौकामध्ये ध्वनीप्रदुषण चेक करण्याकरीता आवाजाची तिव्रता डेसीबल मशिनद्वारे चेक केले असता सदर मशिनचे स्क्रिनवर -------------- ----- असे असल्याचे आम्ही पाहून सांगतो. सदर प्रिंटवर आमची सही करुन पंचांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या. सदर मशिन ही ---------------- टेक्नॉलॉजीस कंपनीची असून तिचा सिरीअल क्रमांक ------------------- असा आहे.

हा पंचनामा -------- वा. सुरु करुन ------- वा. पुर्ण केला आहे.

हा पंचनामा केल ा स.ता.म.

पोलीस उप निरीक्षक
पोलीस ठाणे,

सदरचा पंचनामा आम्ही पंचांनी पाहिला असून तो आमचे उपस्थितीत केला असून तो बरोबर असल्याची खात्री करुन आम्ही सहया करीत आहोत

१)

२)

C

(नमुना पंचनामा तक्रार मिळाल्यानंतर पूर्ण कारवाईचा व घटनास्थळाचा)

पंचनामा तारीख -

पंच नंबर १ ----------------------------------------------------------------------------------------------------------

पंच नंबर २ ----------------------------------------------------------------------------------------------------------

आज रोजी आम्हा वर नमूद करुन दिले पंचास आपण सपोनि/ पोउपनि -------------- पोहवा---------- --------, पोना -----------------, पोशि यांनी --------------- पोलीस ठाणे येथे बोलावलेवरुन हजर झालो. तेथे ----------------पोलीस ठाणेत आम्हा पंचांना कळविले की, ------------ या ठिकाणी ध्वनीप्रदुषण होते अगर कसे? याबाबत पडताळणी करण्याचे असल्याने आपण पंच म्हणून समक्ष हजर राहून दिसत्या वस्तुस्थितीचे परिस्थितीचा पंचनामा लिहून देणेस कळविले, त्यानुसार आम्ही पंच म्हणून उपस्थित राहिलो. पोलीसांनी आम्ही पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ व त्यास अधिन ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम, २००० चे अन्वये कलम १५ व १९ नुसार कायदेशीर कार्यवाही व क्षेत्र / झोन प्रवर्ग अन्वये दिवसा व रात्री असलेली आवाजाच्या संबंधातील सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेचा दर्जा db (A) leq प्रमाणे केली जाते. याबाबत थोडक्यात माहिती दिली.

पोलीसांनी त्यांचे ताब्यात असलेले ध्वनीमापक संयंत्र दर्शविले'व ते आमच्या पंचांसमक्ष चालू करुन सदरचे यंत्राची कार्यपध्दती व त्याचा उपयोग , वापर व हातळणीबाबत थोडक्यात माहिती दिली व पुर्णपणे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्याप्रमाणे सदरचे ध्वनीमापक संयंत्र योग्यरित्या कार्यरत असल्याची खात्री केली. त्याप्रमाणे पोलीसांनी सपोनि / पोउपनि ----------यांचे आदेशानुसार ठाणे अंमलदार --------------- यांनी ------------- पोलीस ठाणेतील ठाणे डायरी नोंद क्रमांक ------------- वेळ -------- येथे नोंद घेतली त्यानंतर आम्ही पंच व पोलीस अधिकरी, कर्मचारी ------------- सदर ठिकाणी मोजणीसाठी लागणारी ध्वनीतिव्रता मोजणी यंत्र db (A) leq यंत्रावर मोजलेल्या चाचणीची प्रत काढणेकरीता प्रिंटरसह ------------- येथे सरकारी वाहनांने त्वरित हजर झालो व सदर ठिकाणी दिसते वस्तुस्थितीचा आम्ही पंचनामा लिहून देतो, तो असा की,

आता आमच्या समक्ष ------------- मोठया ध्वनीक्षेपण यंत्राचा वापर सुरु असून सदर ठिकाण --------- ठिकाणी असून डॉल्बीच्या कर्णकर्कश आवाजावर तेथे लोक बेधुंद स्थितीत नाचत आहेत.

सदर ठिकाणी -------------ध्वनी प्रदुषण करणारे हे --------- आवाजाचे चौकशीत समजून आले. तेथे ट्रॅक्टर / ट्रक / टॅम्पो क्र. ---------- व त्यास जोडलेली ट्रॉली नंबर -------------- या वाहनावर ध्वनी क्षेपक -- --------- स्टेरीओ बॉक्स बसविले आहेत. त्याचा आवाज मोठा कर्णकर्कश आहे. त्याच्या आजूबाजूचे लोकांना व सर्वसामान्य लोकांना ध्वनीचा त्रास होत आहे. म्हणून आवाज कमी करणेस सांगितले असता, त्यास त्यांनी नकार दिलेने सदर होणाऱ्या आवाजाची ध्वनी तीव्रता यंत्राद्वारे मोजत आहे. तशी तोंडी सुचना त्यांना दिली. त्या आवाजाची तीव्रता मोजणेबाबत समक्ष ध्वनी तीव्रता मोजणी यंत्र ऑपरेटर ------------ यांना सांगण्यात आले. त्यांनी ध्वनी तीव्रता मोजणी यंत्राचा वापर करुन, ध्वनी तीव्रता मोजली व जागीच त्याबाबतचा अहवाल ध्वनी प्रक्षेपणाच्या मर्यादेपेक्षा व निवासी क्षेत्रासाठी निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त आहे. त्या रिपोर्टवर पंचनामा करणारे अधिकारी व आम्ही पंचानी सहया केलेल्या आहेत.

हा पंचनामा केला स.ता.म.

पोलीस उप निरीक्षक
पोलीस ठाणे,

सदरचा पंचनामा आम्ही पंचांनी पाहिला असून तो आमचे उपस्थितीत केला असून तो बरोबर असल्याची खात्री करुन आम्ही सहया करीत आहोत

१)

२)

-------------------- याठिकाणी ध्वनी प्रदुषणासाठी वापरलेले ध्वनीक्षेपक स्टेरिओ बॉक्स वापरलेले वाहन व इतर साहित्य जप्त केल्यास प्रचंड जनसमुदायाचा रोष ओडवून कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने

पंचनामा करतेवेळी नमूद साहित्या यावेळी जप्त करण्यात आलेले नाही. ध्वनी मोजणी यंत्राद्वारे मोजणी झालेनंतर, त्या डेसीबल रिपोर्ट प्रिंटरची प्रत श्री.--------------------------यांना देवू करत असताना, ती त्यांनी घेण्यास नाकारली.

तसेच मुळ कामात सामील करण्यात येणाऱ्या डेसिबल रिपोर्ट प्रिंटवर देखील सही करण्यास नकार दिला. सदर रिपोर्टवर सही करण्यासाठी श्री.------------------------------- यांनी नकार दिला.

सदरचे ठिकाण हे ---------------------- चतुर्सिमा ------------------ येथे असून सदर ठिकाण - -------------------- परिसर हा नागरी वस्तीचा व लोकांनी गजबजलेला आहे.

पंचनामा आम्हा पंचांनी समक्ष हजर राहून दिसते वस्तुस्थितीचे, दिसते परिस्थितीप्रमाणे तो आम्ही वाचून या पंचनाम्यावर सहया करण्यात येत आहेत.

पंचनामा -------- वा. सुरु करुन ------- वा. पुर्ण केला आहे.

पंच

समक्ष,

१)

२)

अधिकारी यांचे नावे

नेमणूक ठिकाण

टिप :- सदरचा पंचनामा हा नमुना पंचनामा आहे. प्रत्यक्ष कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांनी घटना व घटनास्थळानुसार आवश्यक ती माहिती नमूद करावी.

D

## पोलीस अधिकारी व कर्मचारी

### जबाब

दि.   /   /२०

श्री. - ----------------------------------, वय - ------ वर्ष, काम - ----------------------, रा.
ठि. - ------------------------------------------------------------------------------------
--

मी वरील प्रमाण असून दिल्या पत्त्यावर माझे कुटुंबीयासमवेत राहतो. मी पोलीस दलामध्ये सन ------- ला भरती झालो असून सध्या ------------------ पोलीस ठाणे येथे -------------- या पदावर कार्यरत आहे.

गणेशोत्सव कालावधीत मोठ्या क्षमतेच्या ध्वनी प्रक्षेपण यंत्रणेचा चा वापर केला जाणार आहे, याची पोलीस खात्यास माहिति मिळाल्याने कोणीही अशा प्रकारे ध्वनी प्रदुषण करु नये, म्हणून सन २०        मध्ये साजरा होणाऱ्या (गणेशोत्सव कालावधीपूर्वीचं गणेश मंडळांनी गणेशमुर्तीची स्थापना करणेसाठी तसेच गणेशोत्सव मिरवणूकीमध्ये) सहभागी होण्याकरीता पोलीस दलाकडे परवानगी अर्ज गणेश मंडळाचे नाव, जबाबदार पदाधिकाऱ्यांची नावे, पत्ते या माहितीसह भरुन घेवून त्याचप्रमाणे सदर देण्यात येणारी परवानगी एकूण ------- अटी व बंधनांचे ध्वनीप्रदुषण (नियमन व नियंत्रण) अधिनियम २००० चा भंग होणार नाही. त्याचप्रमाणे रात्री      वा. ते सकाळी        वा. पर्यंत कोणत्याही प्रकारच्या धवनीक्षेपण यंत्रणेचा वापर करणार नाही. तसेच मोठ्या क्षमतेच्या ध्वनी प्रक्षेपण यंत्रणेचा (डॉल्बी) चा वापर करणार नाही. या प्रमुख अटींची जाणीव करुन देवूनच मंडळांना परवानगी देण्यात आली होती.

सन २० मध्ये दि.   /   /   ते दि.   /   /   या कालावधीमध्ये गणेशोत्सव साजरा होणार असल्याने या मुदतीत कोणीही ध्वनी प्रदुषण करु नये व केल्यास त्यांचेविरुध्द कायदेशिर कारवाई करता यावी, म्हणून आम्ही ठाणे शहर येथे ध्वनी प्रदुषण तपासणी व कार्यवाहीसाठी पथके स्थापन केली होती. या पथकामध्ये पथक प्रमुख ---------------------------------------- यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांचे मदतीस मी, -----------------------, ध्वनी प्रक्षेपण तीव्रता मोजणे करीता ------------- विभागाकडील कर्मचारी  ----------------------- कर्मचारी याची नेमणूक करण्यात आली होती.

(गणेशोत्सव काळात मंडळांनी) ध्वनी प्रदुषण करु नये याकरीता वर्तमानपत्र तसेच वेळोवेळी मंडळाच्या बैठका घेऊन ध्वनी प्रदुषण टाळावे याबाबत आवाहन करण्यात आले होते. पोलीस खात्याने केलेल्या आवाहनास बऱ्याच मंडळांनी सकारात्मक प्रतिसाद दिला होता. असे असतांना देखील दि.  /  / रोजी ------------- रोडवर ----------- तरुण मंडळ मोठ्या क्षमतेच्या ध्वनी प्रदुषण यंत्रणेचा वापर करुन ध्वनी प्रदुषण करीत आहे. याची माहिती --------------- पोलीस ठाणे यांना मिळाल्याने त्यांनी सदरची माहिती ध्वनी प्रदुषण प्रतिबंधक पथक यांना कळविल्याने सदर पथक ------------ पोलीस स्टेशन येथे दाखल झाले. दोन पंचाना बोलावून घेतले व आलेली तक्रार ही खरी आहे किंवा खोटी आहे याची खात्री करणेस घटनास्थळी रवाना होणेपुर्वी सोबत घेतलेल्या पंचांना करण्यात येणाऱ्या कारवाई विषयी माहिती दिली. तसेच ध्वनी प्रदुषण मोजण्याचे जे उपकरण आहे. त्या उपकरणाची कार्यपध्दती देखील समजावून सांगितली. त्यानंतर स्टेशन ठाणे डायरी क्रमांक  -------- ला नोंद करुन तक्रारीनुसार मिळालेल्या घटनास्थळी पंचासह रवाना झालो. पथक घटनास्थळी पोचल्यावर त्यांना ------------ तरुण मंडळ, ------------------- हे एकूण ----------- (स्पिकर) मोठ्या क्षमतेच्या स्पीकरचा वापर करुन मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण करुन ध्वनी प्रदूषण करीत असल्याचे आढळून आले. मंडळ वापरत असलेली ध्वनी प्रक्षेपण यंत्रणा ही ट्रॅक्टर / ट्रक / टेम्पो नंबर ---------- व ट्रॉली नंबर --------- वर ठेवण्यात आली होती.

---------------- तरुण मंडळ ------ हे ध्वनी प्रदुषण करीत होते. म्हणून पथक प्रमुखांनी मंडळाच्या जबाबदार पदाधिकाऱ्यांची समक्ष भेट घेऊन, ध्वनी प्रदुषण करण्यास कायद्याने बंदी आहे. आपण ध्वनी प्रदुषण करीत आहात, तरी तात्काळ आपण करत असलेले बेकायदेशीर कृत्य त्वरीत थांबवावे. याबाबत संबंधितांना समज देण्याचा प्रयत्न केला. तथापि तरुण मंडळ ----------- व त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी पथक प्रमुखांनी केलेल्या विनंतीचा अव्हेर करुन ध्वनी प्रदूषणाचे कृत्य चालूच ठेवल्याने पथक प्रमुखांनी आपण करत असलेल्या ध्वनीप्रदूषणाचे शास्त्रीयदृष्ट्या मोजणी करीत आहोत. याबाबत सुचना दिली व त्याप्रमाणे घटनास्थळी ---------------- या विभागाकडील (ध्वनीमापक मोजणी संयंत्र चालक) कर्मचारी यांनी त्यांचेकडे असलेल्या ध्वनी तीव्रता यंत्राचे मदतीने ध्वनी तीव्रता मोजून त्यांच्या घटनास्थळीच यंत्राव्दारे तीन प्रती काढण्यात आल्या. मोजलेली तीव्रता ही कायद्याने घालून दिलेल्या मर्यादेपेक्षा ---------------------- इतकी जास्त होती. -------------------------- मंडळ ध्वनी प्रदुषण करीत असलेबाबत घटनासथळाचा सविस्तर पंचनामा करण्यात आला. त्याचबरोबर घटनास्थळाचे छायाचित्रण करण्यात आले. पथक प्रमुखांनी केलेल्या पंचनाम्याची प्रत व ध्वनी तीव्रता यंत्राने मोजलेल्या प्रिंटची प्रत ----------- या मंडळाच्या जबाबदार व्यक्तीस देण्याचा प्रयत्न केला. परंतु -------------- मंडळाच्या अध्यक्ष / पदाधिकारी ------------ रा.ठि. -------------- यांनी पंचनामा व प्रिंटची प्रत स्विकारण्यास नकार दिला. तसेच मुळ पंचनाम्यावर सही करणेचे देखील नाकारले, म्हणून त्याबाबतची नोंद मुळ पंचनाम्यावर घेण्यात आली आहे. पंचनाम्यावर स्वाक्षरी केली. ------------------ मंडळ, ---------- हे ----------------------- तील प्रमुख मार्गावर मोठ्या क्षमतेच्या ध्वनी प्रदुषण यंत्रणेचा वापर ध्वनी प्रदुषणासाठी करीत होते. सदर ठिकाणी नागरीकांची बऱ्याच मोठ्या प्रमाणात गर्दी जमली होती. घटनास्थळी होत असलेल्या कर्णकर्षश स्टेरिओ बॉक्सच्या आवाजामुळे झालेल्या ध्वनी प्रदुषणामुळे रस्त्यावर जमलेल्या नागरीकांना व घटनास्थळांच्या जवळपास राहत असलेल्या रागरीकांना त्याचा त्रास जाणवत होता. मी ड्युटी करीत असतांना मला स्वत:लाही मोठ्या आवाजाचे कंपनामुळे छतीत धडधडत होत. तसेच श्वासोच्छवासास देखील त्रास होत होता. मी ध्वनीक्षेपन तिव्रता मोजणीचे काम कानात कापसाचे बोळे घालुन केले आहे. परंतू --------------- मंडळाचे पदाधिकारी हे पोलीसांच्या कोणत्याही सुचनेचे पालन करण्याच्या मनस्थितीत नव्हते. सदर प्रश्नी धार्मिक भावना जोडल्या असल्याने ध्वनी प्रदुषण करणारी यंत्रणा जप्त केलेस कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असता म्हणून ----------- मंडळ, ------------- करीत असलेली ध्वनी प्रदुषण यंत्रणा जप्त करण्यात आलेली नाही.

पथक प्रमुखांनी कारवाई पुर्ण केलेनंतर पुन्हा -------------- पोलीस ठाणे येथे येवून ठाणे डायरी नोंद क्रमांक -------- येथे नोद केली.

माझा जबाब मी वाचला तो बरोबर आहे.

समक्ष

( )

सहा.पोलीस निरीक्षक / पोलीस उप निरीक्षक,

-----------------, पोलीस ठाणे.

टिप:- सदरचे टिपणात परिस्थिती व उत्सवाचे नुसार आवश्यक तो बदल करावा.

E

(प्राधिकृत अधिकारी यांना पाठविण्याचा)

# नमुना रिपोर्ट

प्रति,

प्राधिकृत अधिकारी,

-----------------

प्रतिवेदक :- रिपोर्ट देणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव आणि पद- ------------------------
नेमणूक, ठिकाण याजकडून विनंतीपूर्वक की,

विषय :- ध्वनी प्रदुषण कायदयाचा भंग केलेबाबत..

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करतो की, --------------- त्यात पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ च्या अंतर्गत ध्वनी प्रदुषण तरतुदीनुसार ध्वनी प्रदुषण होते किंवा कसे त्यानुसार त्याचे सुधारीत (नियमन व नियंत्रण) अधिनियम २००० नुसार कारवाई करण्यासाठी ---------------------- हे मोठया क्षमतेच्या ध्वनी यंत्रणेचा वापर करत होते. त्यावेळी त्यांना ध्वनीक्षेपण यंत्रणेचा आवाज कमी करणेस सांगितला, त्यास नकार दिला. तेव्हा पुढील कायदेशीर कारवाई म्हणून ध्वनीक्षेपण तीव्रतेची तांत्रिक तपासणी करत असलेबाबतची तोंडी सुचना दिली व लागलीच ध्वनी तीव्रतेची मोजणी करणारे ऑपरेटर ------------------------- यांना सोबत घेवून ध्वनीक्षेपण यंत्राची ध्वनी मोजणी यंत्राद्वारे तपासणी केली असता ध्वनी प्रक्षेपण तीव्रतेचा रिपोर्ट ----------- आला. त्या रिपोर्टच्या प्रती काढल्या. सदरचा रिपोर्ट ------------ वाजताचा असून त्यामध्ये कायदेशीर तरतुदीनुसार आवश्यक माहिती नमूद आहे. सदर मोजणी रिपोर्टची काढलेली प्रत --------- देवू करता त्यांनी तो घेण्यास ----- -------------- यांनी नकार दिला. तसेच घटनास्थळी पंचनाम्यासह केलेल्या रिपोर्टाच्या प्रतिवर स्वाक्षरी करण्यासही त्यांनी नकार दिला. त्यामुळे त्यांनी -------------------- ध्वनी प्रदुषण संदर्भात सुचना देवूनही ध्वनी प्रदुषण कायद्यातील तरतुदीचा भंग केला आहे. त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. ध्वनी प्रदुषण कायद्याचा भंग करणाऱ्या मंडळाचे नांव | :- | |
| २. नाव व पत्ता | :- | |
| ३. ध्वनी प्रकार | :- | स्टेरीओ बॉक्स संख्या |
| ४. ध्वनी तीव्रता | :- | ------------------------ डेसीबल |
| ५. ध्वनीक्षेपक ठेवलेल्या वाहनाचा प्रकार व नंबर | :- | ट्रॅक्टर नं. --------------------- <br> ट्रॉली नं. --------------------- |
| ६. ध्वनी प्रदुषण कायद्याचा भंग केले ठिकाण | :- | |
| ७. ध्वनी प्रदुषण कायद्याचा भंग केलेची तारीख व वेळ | :- | दि. रोजी ----------- वा. |

सोबत वरील घटनेचा पंचनामा व ध्वनी तीव्रता मापन यंत्राचा अहवाल जोडलेला आहे.

मार्फत : वरिष्ठ पोलीस निरीक्षक, --------------- पोलीस ठाणे
मा. सादर व्हावे,
दि.

अधिकाऱ्याचे नांव, नेमणुकीचे ठिकाण

टिप :- सदरचा रिपोर्ट हा नमुना रिपोर्ट आहे. प्रत्यक्ष कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांनी घटना व घटनास्थळानुसार आवश्यक ती माहिती नमुद करणेची आहे.

F

# कारणे दाखवा नोटीस

प्रति,

-----------------------------------------

-----------------------------------------

-----------------------------------------

मी ------------------------------ (सक्षम अधिकारी) ------------------------- आयुक्तालय / जिल्हा नोटीसीव्दारे आपणांस कळविण्यात येते की, पर्यावरण (संरक्षण) कायदा सन १९८६ आणि ध्वनी प्रदुषण (नियंत्रण व विनियमन ) अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार माझी ------------------------ विभागास ------------------- प्राधिकारी म्हणुन नियुक्ती झालेली आहे.

या नियमाचे तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी आपणांस कळवितो की, आपण ------------------------ तरुण मंडळाचे सदस्य आहात. गणेशोत्सव सार्वजनिकरित्या साजरा करण्यासाठी आपण -------------------------- पोलीस ठाण्याकडे लेखी परवाना मागितला होता. हा परवाना देताना आपण संपुर्ण गणेशोत्सव काळात व गणेश विसर्जन मिरवणुकीचे वेळी ध्वनी प्रदुषण (नियंत्रण व विनियमन) अधिनियम २००० मधील तरतुदीस बाधा येणार नाही याबाबत लेखी सुचना देण्यात आल्या होत्या व आहेत.

या खेरीज आपणांस लेखीसुचनेव्दारे देखील ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यंत्रणेच्या वापरात असलेल्या निर्बंधबाबत लेखी सुचना / नोटीस देण्यात आल्या होत्या व आहेत. असे असतांनाही दि. / /२० रोजी -------------------------- याठिकाणी आपल्या मंडळाच्या गणेश विसर्जन मिरवणुकीत ध्वनीप्रदुषंण (नियंत्रण व विनियमन) अधि नियम २००० च्या तरतुदीचे आपणांकडून जाणुन बुजून हेतुपुरस्कर उल्लंघन झालेबाबत माझेकडे ----------------------------------------- यांचा लेखी अहवाल प्राप्त झाला आहे. त्यानुसार आपण केलेल्या उल्लंघनाबाबत आपणाविरुध्द पुढील कायदेशिर कारवाई का करु नये. याबाबत ही नोटीस मिळाले पासुन ६० दिवसांचे आत आमचे समक्ष आपण स्वत: हजर राहुन खुलासा सादर करावा.

उपरोक्त नोटीसबाबत आपण मुदतीत खुलासा सादर न केलेस आपणास काहीही खुलासा करावयाचा नाही असे समजुन आपणाविरुध्द पुढील कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सोबत:- ध्वनी तिव्रता मोजणी रिपोर्ट प्रिंट व घटनास्थळ पंचनाम्याची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

**टिप:- सदरचे नोटीसमध्ये परिस्थिती व उत्सवाचे नुसार आवश्यक तो बदल करावा.**

G

स.क्रि.के.नं. /२०

**प्रथम खबर**

मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. कोर्ट क्र. ,

यांचे न्यायालयात

श्री.................. वय - ----- वर्ष, व्यवसाय - नोकरी } फिर्यादी

कार्यालय, (समक्ष अधिकारी)

विरुध्द

१) ------------------------, वय - , धंदा - नाही

अध्यक्ष -

रा. ठि. -

२) ------------------------, वय - , धंदा - नाही

सचिव -

रा. ठि. -

३) ------------------------, वय - , धंदा - नाही

सदस्य -

रा. ठि. -

४) ------------------------, वय - , धंदा - नाही

सदस्य -

रा. ठि. -

५) ------------------------, वय - , धंदा - नाही

सदस्य -

रा. ठि. -

६) ------------------------, वय - , धंदा - नाही

सदस्य -

रा. ठि. -

७) ------------------------, वय - , धंदा - नाही

सदस्य -

रा. ठि. -

## पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ चे कलम १५ व १९ तसेच ध्वनी प्रदुषण (विनियमन व नियंत्रण) २००० नियमावली प्रमाणे फिर्याद

मी -------------------------------- या पदावर कार्यरत असून मला पर्यावरण पर्यावरण (संरक्षण) कायदा सन १९८६ च्या ध्वनी प्रदुषण (विनियमन व नियंत्रण) नियमावली सन २००० चे कलम २ (क) नुसार नमूद कलमाप्रमाणे मे.कोर्टात फिर्याद दाखल करण्याचे अधिकार मला सक्षम अधिकारी म्हणून प्राप्त आहे. सन २० चे गणेशोत्सव कालावधीत कायद्याने घालून दिलेल्या नियम व अटींचा भंग करुन यातील आरोपी यांनी ध्वनी प्रदुषणाचा गुन्हा केला असल्याने मला समक्ष अधिकारी म्हणून प्राप्त असलेल्या अधिकारान्वये मी सदरची फिर्याद दाखल करीत आहे.

. .. . . . . . . .. . (जिल्हा / आयुक्तालय) गणेशोत्सव कालावधीत मोठ्या क्षमतेच्या ध्वनी प्रक्षेपण यंत्रणेचा (डॉल्बी) चा वापर केला जाणार याची पोलीस खात्यास माहिती मिळाल्याने कोणीही अशा प्रकारे ध्वनी प्रदुषण करु नये, म्हणून सन २० मध्ये साजरा होणाऱ्या गणेशोत्सव कालावधीपूर्वीच गणेश मंडळांनी गणेशमुर्तीची स्थापना करणेसाठी सर्व गणेश मंडळांना परवानगी देतेवेळी त्यांचेकडून विहित नमुन्यातील परवानगी अर्ज, गणेश मंडळाचे नाव, जबाबदार पदाधिकाऱ्यांची नावे, पत्ते या माहितीसह भरुन घेवून त्याचप्रमाणे सदर देण्यात येणारी परवानगी एकूण ------- अटी व बंधनांचे पालन करण्याच्या शर्तीवरच मंडळांना परवानगी देण्यात आली होती. मंडळांवर घलण्यात आलेल्या अटी व बंधनामध्ये ध्वनी प्रदुषण विनियमन व नियंत्रण २००० चा भंग होणार नाही. त्याचप्रमाणे रात्री ---- वा. ते सकाळी ------वा. पर्यत कोणत्याही प्रकारच्या धवनीक्षेपण यंत्रणेचा वापर करणार नाही. तसेच मोठ्या क्षमतेच्या ध्वनी प्रक्षेपण यंत्रणेचा (डॉल्बी) चा वापर करणार नाही. या प्रमुख अटींची जाणीव करुन / नोटीस देवूनच मंडळांना परवानगी देण्यात आली होती.

सन २० मध्ये दि. / / ते दि. / / या कालावधीमध्ये गणेशोत्सव साजरा होणार असल्याने या मुदतीत कोणीही ध्वनी प्रदुषण करु नये व केल्यास त्यांचेविरुध्द कायदेशिर कारवाई करता यावी, म्हणून आम्ही . . . . . . . . . . . . येथे ध्वनी प्रदुषण तपासणी व कार्यवाहीसाठी पथके स्थापन केली होती. या पथकामध्ये पथक प्रमुख ------------------------------------------ यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांचे मदतीस ---------------------, ध्वनी प्रक्षेपण तीव्रता मोजणे करीता ------------- या विभागाकडील कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली होती.

गणेशोत्सव काळात मंडळांनी ध्वनी प्रदुषण करु नये, याकरीता वर्तमानपत्र तसेच वेळोवेळी मंडळाच्या बैठका घेऊन ध्वनी प्रदुषण टाळावे, याबाबत आवाहन करण्यात आले होते. पोलीस खात्याने केलेल्या आवाहनास बऱ्याच मंडळांनी सकारात्मक प्रतिसाद दिला होता. असे असतांना देखील दि. / / रोजी ------------- रोडवर ----------- तरुण मंडळ, -------------- मोठ्या क्षमतेच्या ध्वनी प्रदुषण यंत्रणेचा वापर करुन ध्वनी प्रदुषण करीत आहे. याची माहिती --------------- पोलीस ठाणे यांना मिळाल्याने त्यांनी सदरची माहिती ध्वनी प्रदुषण प्रतिबंधक पथक यांना कळविल्याने सदर पथक ------------ पोलीस स्टेशन येथे दाखल झाले. दोन पंचाना बोलावून घेतले व आलेली तक्रार ही खरी आहे किंवा खोटी आहे याची खात्री करणेस घटनास्थळी रवाना होणेपुर्वी सोबत घेतलेल्या पंचांना करण्यात येणाऱ्या कारवाई विषयी माहिती दिली. तसेच ध्वनी प्रदुषण मोजण्याचे जे उपकरण आहे. त्या उपकरणाची कार्यपध्दती देखील समजावून सांगितली व त्यानंतर स्टेशन ठाणे डायरी क्रमांक

------- ला नोंद करुन तक्रारीनुसार मिळालेल्या घटनास्थळी पंचासह रवाना झाले. पथक घटनास्थळी पोचल्यावर ------------- हे एकूण -------------- (स्पिकर) मोठ्या क्षमतेच्या स्पीकरचा वापर करुन मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण करुन ध्वनी प्रदुषण करीत असल्याचे आढळून आले. मंडळ वापरत असलेली ध्वनी प्रक्षेपण यंत्रणा ही ट्रॅक्टर / ट्रक / टेम्पो नंबर ---------- व ट्रॉली नंबर --------- वर ठेवण्यात आली होती.

------------------------ तरुण मंडळ, ---------- हे ध्वनी प्रदुषण करीत होते, म्हणून पथक प्रमुखांनी मंडळाच्या जबांबदार पदाधिकाऱ्यांची समक्ष भेट घेऊन ध्वनी प्रदुषण करण्यास कायद्याने बंदी आहे अपण ध्वनी प्रदुषण करीत आहात तरी आपण करत असलेले बेकायदेशीर कृत्य त्वरीत थांबवावे. याबाबत संबंधितांना समज देण्याचा प्रयत्न केला. तथापि --------------------- तरुण मंडळ, . . . . . व त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी पथक प्रमुखांनी केलेल्या विनंतीचा अव्हेर करुन ध्वनी प्रदूषणाचे कृत्य चालूच ठेवल्याने पथक प्रमुखांनी आपण करत असलेल्या ध्वनी प्रदूषणाचे शास्त्रीयदृष्ट्या मोजणी करीत आहोत. याबाबत सुचना दिली व त्याप्रमाणे घटनास्थळी ------------ या विभागाकडील कर्मचारी यांनी त्यांचेकडे असलेल्या ध्वनी तीव्रता यंत्राचे मदतीने ध्वनी तीव्रता मोजून त्यांच्या घटनास्थळीचा यंत्राव्दारे तीन प्रती काढण्यात आल्या. मोजलेली तीव्रता ही कायद्याने घालून दिलेल्या मर्यादेपेक्षा ---------------------- इतकी जास्त होती. ---------------------- मंडळ ध्वनी प्रदुषण करीत असलेबाबत घटनासथळाचा सविस्तर पंचनामा करण्यात आला. त्याचबरोबर घटनास्थळाचे छायाचित्रण करण्यात आले. पथक प्रमुखांनी केलेल्या पंचनाम्याची प्रत व ध्वनी तीव्रता यंत्राने मोजलेल्या प्रिंटची प्रत ----------- या मंडळाच्या जबाबदार व्यक्तीस देण्याचा प्रयत्न केला. परंतु ------------ --- मंडळाच्या अध्यक्ष / पदाधिकारी ----------- रा.ठि. ------------- यांनी पंचनामा व प्रिंटची प्रत स्विकारण्यास नकार दिला. तसेच मुळ पंचनाम्यावर सही करणेचे देखील नाकारले, म्हणून त्याबाबतची नोंद मुळ पंचनाम्यावर घेण्यात आली आहे. पंचनाम्यावर स्वाक्षरी केली. ------------------ मंडळ, ---------- हे ---- ------------------ तील प्रमुख मार्गावर मोठ्या क्षमतेच्या ध्वनी प्रदुषण यंत्रणेचा वापर ध्वनी प्रदुषणासाठी करीत होते. सदर ठिकाणी नागरीकांची बऱ्याच मोठ्या प्रमाणात गर्दी जमली होती. घटनास्थळी होत असलेल्या ध्वनी प्रदुषणामुळे रस्त्यावर जमलेल्या नागरीकांना व घटनास्थळांच्या जवळपास राहत असलेल्या रागरीकांना त्याचा त्रास जाणवत होता. परंतू --------- मंडळाचे पदाधिकारी हे पोलीसांच्या कोणत्याही सुचनेचे पालन करण्याच्या मनस्थितीत नव्हते. सदर प्रश्नी धार्मिक भावना जोडल्या असल्याने ध्वनी प्रदुषण करणारी यंत्रणा जप्त केलेस कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असता म्हणून --------------- मंडळ करीत असलेली ध्वनी प्रदुषण यंत्रणा जप्त करण्यात आलेली नाही.

पथक प्रमुखांनी कारवाई पुर्ण केलेनंतर पुन्हा ------------------------ पोलीस ठाणे येथे येवून ठाणे डायरी नोंद क्रमांक -------------- येथे नोंद केली. त्याचप्रमाणे पथकामध्ये समावेश असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी तसेच घटनास्थळ व शेजारील नागरिकांची टिपणे नोंदवून त्याबाबतचा सविस्तर अहवाल कायदेशिर तरतुदीनुसार आम्हास सादर करण्यात आला. पथकाने केलेल्या चौकशीच्या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केलेनंतर ---------- मंडळाने दि. -------------- रोजी ------------------तील प्रमुख रस्त्यावर मोठ्या क्षमतेच्या ध्वनी प्रदुषण यंत्रणेच्या सहाय्याने ध्वनी प्रदुशाण केले असले बाबतची आमची खात्री झाल्याने त्यांचेवर फिर्याद दाखल करणेपुर्वी कायद्याने बंधनकारक असलेली कारणे दाखवा नोटीस संबंधित ---- -------------- मंडळाच्या अध्यक्ष व पदाधिकारी यांना बजावण्यात आली होती. परंतु वंबंधितांनी नोटीस मिळालेपासून कायदेशीर मुदतीत म्हणजेच ( अधिनियमाच्या तरतुदीनुसार कालावधीप्रमाणे ) दिवसांचे आत कोणताही खुलासा सादर केला नाही. यावरुनच संबंधितांना कोणताही खुलासा करावयाचा नाही, हे स्पष्ट दिसून येते. (खुलास सादर केला असल्यास असमाधानकारक आहे. हे दिसून येते)

मी सादर करत असलेल्या फिर्यादीच्या पृष्ठार्थ पथक प्रमुख यांनी सादर केलेला अहवाल, घटनास्थळ पंचनामा, ध्वनी तिव्रता यंत्राव्दारे मोजलेल्या तिव्रतेची प्रिंट, छायाचित्रण, पथकातील अधिकारी व कर्मचारी यांची नोंदविलेली टिपणे ही सर्व कागदपत्रे स्वतंत्र यादीने जोडली आहेत. ती या फिर्यादीच्या पुष्ठर्थ पुराव्याचा भाग म्हणून समजण्यात यावा.

हि फिर्याद लिहुन दिली
सही / तारीख

**टिप :-** सदरच्या खबरेत व उत्सचाचे नुसार आवश्यक तो बदल करावा.

अतितात्काळ/न्यायालयीन प्रकरण

क्र :- पीमसं/२४/३४/जनहित याचिका १७३/१०/२४०/२०१५ मुंबई, दिनांक ०९.०२.२०१७.

संदर्भ :- शासन, गृह विभाग यांचे क्रमांक डिआयएस ०९१/प्र क्र ४३४/विशा १ ब, दिनांक १४.०६.२०१६ चे पत्र.

विषय :- जनहित याचिका क्रमांक १७३/२०१०
डॉ महेश बेडेकर वि महाराष्ट्र शासन व इतर

००००००

उपरोक्त विषयास अनुसरुन ध्वनीप्रदूषण नियमांची अंमलबजावणी करण्याकरिता मा उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्रमांक १७३/२०१०- डॉ महेश बेडेकर वि महाराष्ट्र शासन व इतर दाखल करण्यात आलेली आहे. सदर याचिकेवरील सुनावणीदरम्यान मा उच्च न्यायालयाने दिनांक १३.०३.१५, २४.०६.१५ व दिनांक १०,११,१२ व १६.०८.१६ रोजी आदेश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने, शासनाने निर्गमित केलेल्या संदर्भात नमूद असलेल्या शासन पत्राची व त्यासोबत प्राप्त झालेल्या ध्वनी प्रदूषण नियंत्रणाकरिता अधिकारी यांना प्राधिकृत केल्याबाबत दिनांक १४.०७.२०१५ च्या अधिसूचनेचा पुर्नरुच्चार करुन निर्गमित केलेल्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या अंतर्गत ध्वनी प्रदुषण नियंत्रणाकरिता राज्यातील पोलीस आयुक्तालयांमध्ये सर्व पोलीस स्टेशन क्षेत्रामध्ये संबंधित पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकारी व सर्व जिल्हा क्षेत्रामध्ये संबंधित पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक दर्जापेक्षा कमी नसलेला अधिकारी किंवा पोलीस स्टेशनचा प्रभारी अधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. [ सोबत अधिसूचनेची प्रत जोडली आहे]

त्यानुसार, राज्यातील सर्व पोलीस आयुक्त व पोलीस अधिक्षक यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील ध्वनीप्रदूषणासंदर्भात प्राधिकृत केलेल्या पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिका-यांची नावे, पत्ते व इतर तपशिलाबाबत स्थानिक वृत्तपत्रे, स्थानिक केबल नेटवर्क, बॅनर्स, पोस्टर्स, भित्तीपत्रके इ. माध्यमाद्वारे तसेच पोलीस आयुक्त व पोलीस अधिक्षक यांनी त्यांच्या संकेतस्थळावर व जिल्हाधिकारी व संबंधित महानगरपालिका आणि नगरपरिषदांच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच, वरील प्राधिका-यांची नावे सर्व महानगरपालिका/नगरपरिषदा यांच्या वॉर्ड कार्यालयांमधील सूचना फलकांवर स्पष्टपणे दिसेल अशा पध्दतीने दर्शविण्यात याव्यात. [ सोबत विहित नमुन्याची प्रत जोडली आहे ]

तसेच सर्व पोलीस आयुक्त व अधीक्षक यांचेकडून सदर प्रकरणी यापूर्वीही कार्यवाही करण्यात आली असली तरीही ध्वनीप्रदूषणसंदर्भात पाळावयाच्या नियमांबाबत संपूर्ण राज्यात एकसूत्रीपणा येण्यासाठी सदर कार्यवाही पुन:श्च नव्याने करणे अपेक्षित असून वर नमूद करण्यात आलेली

प्रसिध्दीबाबतची कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल एका महिन्यात या कार्यालयास पाठवावा. सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पाठविण्याबाबतचे विहित विवरणपत्र यथावकाश सर्व पोलीस घटकप्रमुखांना पाठविण्यात येईल. नमूद सूचनेची अंमलबजावणी होण्याकरिता सर्व पोलीस घटक प्रमुखांनी व्यक्तिशः लक्ष घालून सदर कार्यवाही पूर्ण करुन घेणे आवश्यक राहील. सदर सूचनेच्या अनुषंगाने कारवाई केली नसल्याचे आढळल्यास त्या संबंधित घटकप्रमुखांवर जबाबदारी निश्चित केली जाईल याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

[ प्रशांत कुमार ]
विशेष पोलीस महानिरीक्षक [का व सु]
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,
सर्व पोलीस आयुक्त
सर्व पोलीस अधिक्षक

## पोलीस आयुक्त / अधीक्षक, -------
## ध्वनी प्रदूषण नियंत्रणाबाबात सूचना

जनहित याचिका क्र. १७३/२०१० (डॉ.महेश बेडेकर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) या याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने ध्वनी प्रदूषणाबाबतच्या नियंत्रणाबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देशांना अनुसरुन गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील तरतूदींनुसार दि.१४-०७-२०१५ रोजीच्या (सोबत जोडलेल्या) अधिसूचनान्वये ध्वनी प्रदुषण नियंत्रणासाठी प्राधिकृत अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे.

तरी ---------------------- पोलीस आयुक्तालयातील / जिल्हा ध्वनी प्रदुषण नियंत्रण अधिकाऱ्यांची नावे खालीलप्रमाणे असून आयुक्तालय / जिल्हा कार्यक्षेत्रातील जनतेला ध्वनी प्रदूषणाबाबत तक्रार करावयाची असल्यास ते संबंधित प्राधिकृत अधिकारी यांच्याशी संपर्क साधून त्यांच्याकडे तक्रार नोंदविण्याची कार्यवाही करावी.

| अ.क्र. | स.पो.आ./पो.ठा.प्रभारी अधिकारी यांचे नाव | नेमणूक | कार्यालय फोन | मोबाईल | ई मेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**ध्वनी प्रदुषण तक्रारीचे निवारण न झाल्यास संपर्क साधावा -**

डी.सी.पी / डी.वाय. एस.पी. - नाव -

पत्ता -

दुरध्वनी क्र. -

ई मेल आयडी -

सही/-

(--------------------------)

पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक, ----------

अतितात्काळ/न्यायालयीन प्रकरण

क्र :- पोमसं/२४/३४/जनहित याचिका १७३/१०/२४०/२०१५ मुंबई, दिनांक ०१.०२.२०१७.

संदर्भ :- या कार्यालयाचे समक्रमांकित दिनांक २०.०९.१६ व २०.१०.१६ चे ज्ञापन.

विषय :- जनहित याचिका क्रमांक १७३/२०१०

डॉ महेश बेडेकर वि महाराष्ट्र शासन व इतर

०००००० 

उपरोक्त विषयास अनुसरुन ध्वनीप्रदूषण नियमांची अंमलबजावणी करण्याकरिता मा उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्रमांक १७३/२०१०- डॉ महेश बेडेकर वि महाराष्ट्र शासन व इतर दाखल करण्यात आलेली आहे. सदर याचिकेवरील सुनावणीदरम्यान मा उच्च न्यायालयाने दिनांक १३.०३.१५, २४.०६.१५ व दिनांक १०,११,१२ व १६.०८.१६ रोजी आदेश दिलेले आहेत. सदर आदेशांचे पुनरुच्चार करुन तसेच शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार व त्या अनुषंगाने या कार्यालयाने दिलेल्या सूचनांचे अवलोकन करुन राज्यातील सर्व पोलीस आयुक्त व पोलीस अधिक्षक यांना विनंती करण्यात येते की, राज्यात साजरे होणा-या विविध सणांच्या व कार्यक्रम व उत्सवांच्या वेळी ध्वनीप्रदूषण होऊ नये यासाठी लोकांमध्ये जागृती होण्याच्या दृष्टीने ध्वनीप्रदूषणामुळे होणारे नुकसान तसेच ध्वनीप्रदूषण केल्यामुळे होणा-या शिक्षेबाबत कायदयातील तरतुदींची माहिती व ध्वनीप्रदूषणाबाबतची तक्रार ज्या माध्यमाद्वारे करता येईल पोस्टर्स, बॅनर्स, भित्तीपत्रके, तयार करुन संबंधित पोलीस स्टेशनच्या हद्दीतील सर्व गृहनिर्माण संस्था, औदयोगिक संस्था येथे लावण्यात यावी. तसेच चित्रपटगृहात क्लीपद्वारे दाखविण्यात यावी. तसेच ध्वनीप्रदूषणाबाबत जास्तीत जास्त लोकांना माहिती होण्यासाठी वरील प्रमाणे बॅनर्समधील मजकूर वृत्तपत्रात प्रसिध्दीसाठी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. [ सोबत विहित नमुन्याची प्रत जोडली आहे ]

तसेच सर्व पोलीस आयुक्त व अधीक्षक यांचेकडून सदर प्रकरणी यापूर्वीही कार्यवाही करण्यात आली असली तरीही ध्वनीप्रदूषणसंदर्भात पाळावयाच्या नियमांबाबत संपूर्ण राज्यात एकसूत्रीपणा येण्यासाठी सदर कार्यवाही पुन:श्च नव्याने करणे अपेक्षित असून वर नमूद करण्यात आलेली प्रसिध्दीबाबतची कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल पुराव्याच्या कागदपत्रांसह एका महिन्यात या कार्यालयास पाठवावा. सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पाठविण्याबाबतचे विहित विवरणपत्र यथावकाश सर्व पोलीस घटकप्रमुखांना पाठविण्यात येईल. नमूद सूचनेची अंमलबजावणी होण्याकरिता सर्व पोलीस घटकप्रमुखांनी व्यक्तिश: लक्ष घालून सदर कार्यवाही पूर्ण करुन घेणे आवश्यक राहील. सदर सूचनेच्या अनुषंगाने कारवाई केली नसल्याचे आढळल्यास त्या संबंधित घटकप्रमुखांवर जबाबदारी निश्चित केली जाईल याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

[ प्रभात कुमार ]

विशेष पोलीस महानिरीक्षक [का व सु]

पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त

सर्व पोलीस अधिक्षक

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष २, अंक ५८(२)] शुक्रवार, मे ६, २०१६/वैशाख १६, शके १९३८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १३९

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

गृह विभाग (विशेष)

मंत्रालय, मुंबई, दिनांक १४ जुलै २०१५

अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१.

क्रमांक डीआयएस. ०९१०/प्र.क्र. ४३४/वि. शा.-१ब.—महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या तरतुदींअंतर्गत ध्वनी प्रदुषण नियंत्रणाकरिता खालील अधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्यात येत आहे :—

| अ. क्र. (१) | क्षेत्र (२) | कार्यकक्षा (३) | अधिकाऱ्याचे पदनाम (४) |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्यातील सर्व पोलीस आयुक्तालयाची क्षेत्रे. | सर्व पोलीस स्टेशन क्षेत्र. | संबंधित पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक दर्जापेक्षा कमी नसलेला अधिकारी. |
| २ | महाराष्ट्र राज्यातील सर्व पोलीस आयुक्तालये वगळून सर्व जिल्हा क्षेत्रे. | सर्व पोलीस स्टेशन क्षेत्र. | संबंधित पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक दर्जापेक्षा कमी नसलेला अधिकारी किंवा पोलीस स्टेशनचा प्रभारी अधिकारी. |

पोलीस महासंचालक, सर्व पोलीस आयुक्त, सर्व जिल्हादंडाधिकारी आणि सर्व पोलीस अधीक्षक यांना सूचना देण्यात येत आहेत की, त्यांनी वरील सर्व प्राधिकाऱ्यांची नावे, पत्ते व इतर तपशिलाबाबत स्थानिक वृत्तपत्रे, स्थानिक केबल नेटवर्क, त्यांच्या संकेतस्थळावर तसेच जिल्हाधिकारी व संबंधित महानगरपालिका आणि नगर परिषदांच्या संकेतस्थळावर प्रसिद्धी देण्यात यावी. त्यांना अशाही सूचना देण्यात येत आहेत की, वरील प्राधिकाऱ्यांची नावे सर्व महानगरपालिका/नगर परिषदा यांच्या वॉर्ड कार्यालयामधील सूचना फलकांवर स्पष्टपणे दिसेल अशा पद्धतीने दर्शविण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सु. ज. सोवितकर,
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT (SPECIAL)

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 14th July 2015

*NOTIFICATION*

MAHARASHTRA POLICE ACT, 1951.

No. DIS 0910/C.R. 434/SPL-1B.—Under the provisions of the Maharashtra Police Act, 1951, the following officers are declared as authorities for the purpose of control of Noise Pollution :—

| Sr. No. (1) | Area (2) | Jurisdiction (3) | Designation of the Officer (4) |
|---|---|---|---|
| 1 | All Police Commissionerate areas in the State of Maharashtra. | Every Police station area. | The officer not below the rank of Inspector of the respective police station. |
| 2. | All District areas other than Police Commissionerate areas. | Every Police station area. | The officer not below the rank of Inspector of the respective police Station or the officer in charge of the Police Station. |

The Director General of Police, all Commissioners of Police, all District Magistrates and all Superintendents of Police are instructed to publish the names, addresses and other details of the above authorities under their respective control for the respective areas ; give wide publicity in the local newspapers, on local cable networks and on their respective websites and the website of the District Collectors, concerned Municipal Corporations and Municipal Councils. They are also instructed to make sure that the names of the above Authorities are displayed on the notice board of all Ward Offices of all Municipal Corporations/Municipal Councils.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. J. SOVITKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

# आयुक्तालय / जिल्हाचे नाव
# पोलीस ठाण्याचे नाव

**जाहीर आवाहन !** **जाहीर आवाहन !** **जाहीर आवाहन !**

मा.उच्च न्यालयाने दिलेल्या आदेशावरुन सण / उत्सवाच्या वेळी ध्वनीप्रदुषण होऊ नये यासाठी आपण आपआपले सोसायटीमध्ये / गावामध्ये लाऊड स्पीकर माठयाने अगर कर्कश आवाजात वाजवू नये. तसेच मा.सर्वाच्च न्यायालयाने पर्यावरण संरक्षणाचा कायदा सन १९८६ व ध्वनी प्रदुषण अधिनियम २००० मधील तरतूदींचे सक्त पालन करण्याबाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्या अन्वये रात्री १०.०० वा. पासून सकाळी ०६.०० वा. पर्यंत लाऊड स्पीकर, फटाके, वाद्ये वाजविण्यास सक्त बंदी केलेली आहे. तसेच सकाळी ०६.०० वा. पासून रात्री १०.०० वा पर्यत सुध्दा लाऊड स्पीकर, फटाके, वाद्ये इत्यादी खालील मर्यादेपेक्षा जास्त आवाजाने वाजविण्यास बंदी केलेली आहे.

| विभागाचे कोड | विभाग / झोनची वर्गवारी | आवाजाची क्षमता (डेसिमल मध्ये) | |
|---|---|---|---|
| | | दिवसाचे वेळी | रात्रीचे वेळी |
| ए | औद्योगिक क्षेत्र (Industrial area) | ७५ | ७० |
| बी | विपणन क्षेत्र (Commercial area) | ६५ | ५५ |
| सी | रहिवाशी क्षेत्र (Residential area) | ५५ | ४५ |
| डी | शांतता विभाग (Silence Zone) | ५० | ४० |

वरील नमुद मर्यादेचे उल्लंघन होणार नाही याची संबंधीतांनी दक्षता घ्यावी.

ध्वनीप्रदुषण (नियमन व नियंत्रण) सन २००० चे उल्लंघन केल्यास इनव्हायरमेंट (प्रोटेक्शन) ॲक्ट सन १९८६ चे कलम १५ प्रमाणे ५ वर्षे कैदेची किंवा एक लाख रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकते तसेच शिक्षा होऊप सुध्दा असे गुन्हे चालु ठेवल्यास पुढील प्रत्येक दिवसाला ५ हजार रुपये दंडाची तरतुद आहे. तसेच कलम १५ (१) प्रमाणे शिक्षा लागल्याचे १ वर्षापर्यंतच्या काळात पुन्हा असे गुन्हे केल्यास ७ वर्षे पर्यंतची शिक्षा होऊ शकते.

या नियमाखालील गुन्हे दखलपात्र, अजामीनपात्र व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाकडे चालतील. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे उल्लंघन झाल्यास न्यायालयाचा अवमान केला म्हणुन कारवाई होऊ शकते.

**ध्वनीप्रदुषण संदर्भातील तक्रार आपण खालील फोन नंबर / ईमेल आयडीवर करु शकता.**

नियत्रंण कक्षाचा दुरध्वनी नंबर -
पोलीस ठाण्याचा दुरध्वनी नंबर -
ई-मेल आयडी -